महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३७ वा | दिनांक : २२/०२/२०२५ | वार : शनिवार

## माणिकराव कोकाटेंची आमदारकी रद्द करुन हकालपट्टी करा : काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची आक्रमक भूमिका

**मुंबई :** रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेऊन लाल बहादूर शास्त्री यांनी राजीनामा देऊन आदर्श घालून दिला आहे. पण आत्ताच्या सत्ताधारी भाजपाने नैतिकतेला हरताळ फासला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना फसवणूक प्रकरणी न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा होता किंवा सरकारने त्यांचा राजीनामा घ्यायला हवा होता पण तसे झाले नाही. आता महामहिम राज्यपाल यांनीच या प्रकरणात लक्ष घालून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा व त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

महाराष्ट्र एसटी कामगार काँग्रेसने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भेट दिली, त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर मानहानीच्या एका बोगस प्रकरणात न्यायालयाने शिक्षा ठोठवली असता सचिवालयाने अर्ध्या रात्रीच त्यांची खासदारकी रद्द केली, त्यानंतर त्यांचे शासकीय घरही सोडण्यास भाग पाडले तसेच काँग्रेसचे नेते व माजी मंत्री सुनिल केदार यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावताच त्यांची आमदारकी तात्काळ रद्द करण्यात आली पण माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत वेगळा न्याय आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांसाठी वेगळा न्याय कसा, असा प्रश्न विचारून कोकाटे प्रकरणात सरकार लोकशाही पद्धतीने वागत नाही असे सपकाळ म्हणाले. शिवरायांचे मावळे आणि संघ स्वयंसेवकांची तुलनाच होऊ शकत नाही.. गोविंदगिरी महाराजांच्या विधानावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आणि संघ स्वयंसेवक यांची तुलनाच होऊ शकत नाही. हा महाराजांचा आणि मावळ्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकेला विरोध करणारा विचार हा संघाच्या विचाराशी मिळता जुळता आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या शौर्याबद्दल अफवा पसरवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. मावळ्यांचा विषय जातीच्या पलीकडचा आहे, ते कोणत्या जाती धर्माचे नव्हते तर स्वराज्याच्यासाठी लढणारे छत्रपतींचे सैन्य होते. हेच गोविंदगिरी देवेंद्र फडणवीस यांना छत्रपती शिवाजी महाराजांना जिरेटोप घालून त्यांना महाराज बनवण्याचा प्रयत्न करत होते. जिरेटोप हे शिवाजी महाराजांचे प्रतिक आहे ते सुद्धा आरएसएस बळकावू पहात आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

महाकुंभमेळ्यावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सपकाळ म्हणाले की, कुंभमेळा हा राजकारणाचा आखाडा नाही त्यामुळे यावर राजकारण नको ही काँग्रेसची भूमिका आहे.पण कुंभमेळा हा काही पहिल्यांदाच होत नाही याआधाही कुंभमेळे झाले आहेत आणि पंतप्रधान व राष्ट्रपती यांनीही त्यात सहभाग घेतलेला आहे. यावेळी मात्र मोदी-योगी यांनी महाकुंभमेळ्याला राजकीय स्वरुप दिले आहे. पण भाविकांसाठी व्यवस्था दिसून आली नाही, चेंगराचेंगरीत भाविकांचे मृत्यू झाले. चांगली व्यवस्था केली असती तर आणखी लोकांना कुंभमेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली असती, असेही सपकाळ म्हणाले.

महाराष्ट्र एसटी काँग्रेसच्या रक्तदान शिबिरात बोलताना सपकाळ म्हणाले की, एसटी ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी आहे, ग्रामीण भागात एसटी सेवेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे, ही सेवा चालू राहिली पाहिजे. एसटीमध्ये ज्या सवलती दिल्या जातात त्याचा पैसा राज्य सरकारने एसटी महामंडळाला दिला पाहिजे. एसटी कामगारांच्या वतीने रक्तादानासारखे महत्वाचे कार्य वर्षानुवर्षे सुरु आहे हे कौतुकास्पद आहे असेही सपकाळ म्हणाले. महाराष्ट्र एसटी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाला राज्यभरातून आलेले एस टी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पंतप्रधानच्या हस्ते उद्‌घाटन



**दिल्ली :** राजधानी दिल्लीत आजपासून ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला थाटात सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विज्ञान भवनात आयोजित एका सोहळ्यात या संमेलनाचे उद्घाटन झाले. हे संमेलन रविवारपर्यंत चालेल. आज दिल्लीत ग्रंथ दिंडी काढून या संमेलनाची शोभा वाढवण्यात आली. यावेळी विविध प्रकारे सजवण्यात आलेले चित्ररथ सर्वांचेच आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले.

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची काश्मिरी कन्या रुकय्या मकबूल हिच्या आवाजात मराठीप्रमाणेच अभिजात भाषेचा दर्जा लाभलेल्या प्राकृत भाषेतील सुमारे २५०० वर्षांपूर्वीच्या मंगलकामना करणाऱ्या जैन धर्मातील नवकार मंत्राने सुरुवात झाली.




## लाडकी बहीण, एसटी सवलत बंद होणार नाही : एकनाथ शिंदे



**मुंबई :** महायुती सरकारच्या वतीने सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण योजना तसेच एसटी मधील तिकीट दरात सवलत बंद होणार नाही. या योजना लाडक्या बहिणीसाठी कायम सुरू राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी एसटी मधील महिलांच्या सवलत योजनेमुळे एसटी महामंडळ तोट्यात आले असल्याचे म्हटले होते. यावर शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर देखील टीका केली. जनतेनेच त्यांना घरी बसवले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे यांना धक्का दिला जात असल्याच्या बातम्या मी सातत्याने वाचत आहे. मात्र, मला एवढे धक्के बसले की आता मी धक्का पुरुष झालो असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले होते. इतकेच नाही तर मी त्यांना एकच धक्का देईल की ते दिसणारच नाहीत, असा इशारा देखील त्यांनी शिंदे यांना दिला होता. यावर देखील एकनाथ शिंदे यांनी पलटवार केला आहे. पक्ष वाढवणाऱ्या, पक्षासाठी चांगले काम करणाऱ्या नेत्यांना धक्के देऊन त्यांनी पक्षातून बाहेर काढले. त्यामुळे विधानसभेला नागरिकांनीच उद्धव ठाकरे यांना धक्का देऊन घरी बसवले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील जनतेने बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना धक्का देणाऱ्यांना विधानसभेला धक्का देऊन घरी बसवले. असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने जे काम केले, ते काम पाहूनच विधानसभा निवडणुकीत नागरिकांनी आम्हाला मतदान केले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. माझ्यावर कितीही आरोप करा, कितीही शिव्या द्या, मात्र महाराष्ट्रातील जनता माझ्यासोबत आहे, तोपर्यंत कोणीही काहीही करू शकणार नसल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. त्याचबरोबर एसटी महामंडळांच्या बसेसमध्ये महिलांना ५० टक्के सवलत दिलेली असून ही योजना देखील बंद होणार नाही. असे देखील एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. प्रवाशांना दिलेले वचन आम्ही पाळणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ज्येष्ठ नागरिकांना, महिलांना दिलेल्या सवलतीमुळे एसटी तोट्यात आली नसल्याचे देखील त्यांनी सांगितले. या माध्यमातून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेला दावा एकनाथ शिंदे यांनी फेटाळून लावला आहे.

आमची शिवसेना मजबूत कंपनीच्या शेअर सारखी आहे. लोक आमच्यावर विश्वास ठेवत आमच्या सोबत येत आहेत. आमची शिवसेना मजबूत कंपनीचे शेअर आहेत. त्यामुळे बाजारात कितीही चढ उतार असला तरी लोक कायमच चांगले शेअर खरेदी करतातच, असे म्हणत त्यांनी पक्षात येणाऱ्या नागरिकांचे स्वागत केले. मी बाळासाहेब आणि दिघे साहेबांचा कार्यकर्ता आहे. मला हलक्यात घेऊ नका, हा माझा इशारा आहे. ज्याला समजून घ्यायचा त्यांनी समजून घ्यावा. एक मराठी व्यक्तीला महादजी शिंदे अशा मोठ्या महापराक्रमी व्यक्तीच्या नावाने पुरस्कार दिला जातो. हे माझे भाग्य आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला हा पुरस्कार मिळाल्यामुळे किती जळजळ झाली? असा सवाल त्यांनी उद्धव ठाकरे गटाला विचारला आहे. आणखी किती जळणार? जळून - जळून एक दिवस राख होतील, असेही त्यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ फेब्रुवारी २०२५


## २४ वर्षे झालीत तरी सरकार अनुदान देईना : प्राध्यापकांवर उपासमारीची वेळ

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील कायम विनाअनुदानित धोरण लागू होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या ७८ कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा विषय गेल्या २४ वर्षांपासून प्रलंबित पडला आहे. शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सभागृहात जाहीर करूनही जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे.शिक्षणमंत्री व अर्थमंत्री एकमेकांची नावे सांगून टोलवाटोलवी करत आहेत.

यामुळे राज्यातील ७८ महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापकांवर उपासमारीची वेळ आलीय.अनुदान द्यायचे की नाही याबाबत उच्च व तंत्र शिक्षण आणि वित्त विभागाने एकदाचा काय तो सोक्षमोक्ष लावण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. विनाकारण अनुदानाची आस दाखवीत सहायक प्राध्यापकांना खेळवत ठेवण्याचे राजकारण शिक्षण व वित्त विभाग करत आहे. राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २००१ रोजी कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारल्यानंतर मान्यता देण्यात आलेल्या एकाही महाविद्यालयाला अनुदान दिले नाही.

कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारण्यापूर्वी विनाअनुदानित महाविद्यालय म्हणून मान्यता असलेल्या महाविद्यालयांना आता तरी अनुदान द्यावे, अशी मागणी शासनाकडे प्राध्यापक संघटनेने अनेकदा केली आहे. दीड वर्षे मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन करूनही शासनाने केराची टोपली दाखवलीय.

देवेंद्र फडणवीस, अजित पवार, चंद्रकांत पाटील या दिग्गज मंत्र्यांनी केवळ आश्वासन देत गाजर दाखवण्याचे काम केले आहे. वित्त विभागाने अनुदानाची फाईल फेटाळल्याची माहिती मिळाल्याने सहायक प्राध्यापकांकडून संतप्त भावना व्यक्त करण्यात येत आहे.

वित्त विभागाच्या दुर्लक्षामुळे महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे ही मोठे अवघड म्हणणे आहे.

यामधील अनेक प्राध्यापक निवृत्त व्हायला आलेत.त्यांचे मुलंमुली लग्नाच्या वयाचे झाले आहेत.

घरात आईवडील आजारी आहेत त्यांच्या दवाखान्याचा खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, उपजीविकेचे प्रश्न आणि न मिळणारा पगार यामुळे प्राध्यापक हवालदिल झाले आहेत.

राज्य शासनाने ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देणे नितांत गरजेचे आहे . आम्ही सहायक प्राध्यापक मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असून त्यांच्याकडे पुन्हा एकदा आमची व्यथा मांडणार आहोत.

महिनाभरात अनुदानाचा तिढा न सुटल्यास थेट उच्च न्यायालयातच दाद मागू डॉ.भाऊसाहेब झिरपे, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृती समिती






## आमदार संजना जाधव यांच्या हस्ते ब्लिचिंग मिक्सरचे उद्घाटन



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड नगरपालिका हद्दीतील कन्नड शहराला पिण्या चे पाण्याचा पुरवठा करणारे पाणी फिल्टर या ठिकाणी आज आमदार सौ संजना जाधव यांनी ब्लिचिंग पावडर मिक्सर यंत्रांना चे उद्घाटन आज दि. 21 फेब्रुवारी रोजी यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले.

कन्नड नगर परिषदेने गेला तेरा वर्षा पासून बंद असल्याने हे ब्लिचिंग मिक्सर व मोटर बंद होती. याची माहिती समोर आल्यानंतर दहा दिवस अगोदर आमदार जाधव व उपविभागीय अधिकारी संतोष गोराड यांनी भेट दिली होती. आ संजना जाधव यांना शहरातील सर्व सामान्य महिला व नागरिक यांनी भेटून तक्रार केले होती नगरपालिकेच्या वतीने दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे व पाणी पिण्यास योग्य नाही.

पाण्याचा घाणेरडा वास येतो याचा विचार करून लगेच आ संजना जाधव पाणी फिल्टर भेट दिली. व प्रत्यक्ष पाहणी केली असताना त्या ठिकाणी असे आढळून आले की तेथील यंत्रणा ही गेल्या तेरा वर्षा पासून बंद आहे अशी माहिती तेथील एका कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याचे अटीवर दिली. कन्नड नगर पालिके वतीने शहरातील जनतेला तोच पाण्याचा पुरवठा होत आहे. दूषित पाणी पिल्या मुळे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो हाच विचार करून आ जाधव यांनी ताबडतोब आदेशित करून त्या ठिकाणी ब्लिचिंग मिक्सर पावडर यंत्रणा सुरू करण्यात आली.

याप्रसंगी कन्नड नगरपालिकेचे प्रशासक तथा तहसीलदार विद्याचरण कडवकर म्हणाले की आता कन्नड शहरवासीयांना स्वच्छ पाणी येणार आहे.याप्रसंगी कन्नड पंचायत समितीचे बीडीओ चंद्रहार ढोकणे, नगरपालिका पाणीपुरवठा निरीक्षक देविदास पाटील, बाजीराव शिरसे, माजी उपनगराध्यक्ष डॉ सदाशिव पाटील, माजी पाणीपुरवठा सभापती रत्नाकर पंडित, माजी नगरसेवक कैलास जाधव, माजी नगरसेवक संतोष पवार, आदित्य गर्जे पाटील, मार्केट कमिटी उपसभापती जयेश बोरसे, ज्ञानेश्वर निकम, एकलव्य संघटनेचे पवन सोनवणे, रुग्ण कल्याण समितीचे राम पवार, सिद्धार्थ निकाळजे, लक्ष्मीकांत सुरे, प्रकाश काचोळे,रितेश जाधव, विश्वजीत बागुल, प्रदीप बोडखे, श्रीराम घुगे, प्रशांत बारगळ, प्रशांत शिंदे, अनिल थोरात, दीपक दाभाडे, अल्केश नवले, प्रल्हाद तायडे, संदीप घोंगटे, इत्यादी शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## उन्हाची तीव्रता व पवित्र रमजान महिना यामुळे शाळा सकाळच्या सत्रात भरवा शिक्षक समितीची मागणी




**कन्नड (अरुण थोरात):** सध्या उन्हाची प्रचंड तीव्रता वाढली असून विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांमध्ये बसणे असहाय्य झाले आहे जिल्हाभरातील अनेक शाळेत पत्र्याचे शेड असून त्या शेड खाली बसून अध्यापन करणे कठीण जात असून पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे.

विद्यार्थ्यांना जर पवित्र ज्ञानदानाचे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने करायचे असेल तर शाळा ह्या तासिकांची संख्या कमी न करता आरटीई च्या नियमानुसार पाच तासिका पुर्ण होतील अशा प्रकारे शाळा सकाळ सत्रात भरव्यात शिवाय पवित्र रमजान चा महिना दोन मार्चपासून चालू होत असून मुस्लिम बांधवांना पूर्ण महिनाभर उपवास असतो त्यांचाही विचार करून त्यांच्याही आरोग्यावर परिणाम न होता विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचा विचार करू शाळा सकाळच्या सत्रात भराव्यात अशी मागणी शिक्षक समितीने एका निवेदनाद्वारे शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना केली आहे.

या निवेदनावर शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष विजय साळकर, सरचिटणीस रंजीत राठोड, नितीन नवले, श्याम राजपूत,राजू ठाकूर, अंकुश चव्हाण, रऊफ पठाण, गजानन वरकड, अशोक डोळस, प्रसिध्दी प्रमुख सतीश कोळी,बबन थोरे, प्रविण गायकवाड, उर्दू विभागाचे अध्यक्ष जावेद अन्सारी सिहाबाद मुन्सी, फातेमा बाजी अलीम सर, पाशु शहा यांनी दिल्याचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सतीश कोळी यांनी कळवले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ फेब्रुवारी २०२५


# विद्रोही साहित्य संमेलनाचे औपचारिकरित्या उद्‌घाटन, सांस्कृतिक विचारधारा यात्रेने होणार सुरूवात

" सत्य असत्याशी मन केले ग्वाही,मानियेले नाही बहुमता "- संत तुकाराम

१९ वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन

२१, २२, २३ फेब्रुवारी २०२५ | छत्रपती संभाजीनगर



**संभाजीनगर(अरुण थोरात) :** १९ वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाला जागतिक कीर्तीचे प्रबोधनात्मक नाटक शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला नाटकाने सुरुवात झाली आहे. तर संमेलनाचे औपचारिकरित्या उद्‌घाटन शनिवारी सकाळी होणार आहे.

त्याआधी सकाळी नऊ वाजता औरंगपुरा येथील महात्मा जोतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यापासून ते आमखास मैदानापर्यंत सांस्कृतिक विचारधारा यात्रा काढण्यात येणार आहे.आमखास मैदानावर उभारलेल्या मलीकअंबर साहित्य नगरीत शनिवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता संमेलनाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष मराठीतील लोकसाहित्य, संस्कृती व प्राच्यविद्या अभ्यासक, इतिहास संशोधक,भाषा तज्ञ, विचारवंत डॉ.अशोक राणा यांची उपस्थिती राहणार आहे.

तर ख्यातनाम आंबेडकरवादी हिंदी साहित्यिक, समीक्षक, अनुवादक, विचारवंत कंवल भारती (दिल्ली) यांच्याहस्ते संमेलनाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी प्रख्यात ग्रामीण साहित्यिक व पूर्वाध्यक्ष डॉ. वासुदेव मुलाटे, कवयित्री प्रा. प्रतिभा अहिरे, प्रा.प्रल्हाद लुलेकर, प्रख्यात उर्दू साहित्यिक नुरूल हसनैन, सूर्यकांताताई गाडे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी महात्मा फुले कृत सत्याचा अखड गायन शितल गावीत (नंदूरबार), पावरी वादन अमृत भील आणि सहकारी (धुळे) लोकशाहीर वामनदादा कर्डक रचित गीत वंदन मानसाला कुणाल वराळे, संत कबिराच्या दोह्याचे गायन नरेंदर राठोड आणि सहकारी तर विद्रोही संमेलनगीत डॉ. गणेश चंदनशीवे (मुंबई) सादर करणार आहेत.विद्रोही साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा.प्रतिमा परदेशी, राज्यसंघटक किशोर ढमाले, स्वागताध्यक्ष इंजि. सतीश चकोर व मुख्यनिमंत्रक ॲड.धनंजय बोर्डे, कार्याध्यक्ष खलील अहमद, खजीनदार ॲड.के.ई.हरिदास, अनिलकुमार बस्ते, भाऊसाहेब जाधव, समन्वयक प्रा.भारत सिरसाठ, ॲड.वैशाली डोळस, अनंत भवरे, डॉ.धोंडोपंत मानवतकर, वजीर शेख, जितेंद्र भवरे, मधुकर खिल्लारे, सविताताई अभ्यंकर, डॉ विनय हतोले, रामदास अभ्यंकर, भीमराव गाडेकर, वैभव सोनवणे, सुधाकर निसर्ग, कबीर बोर्डे, रतनकुमार साळवे यांनी केले आहे.

विद्रोही जीवन गौरव पुरस्कारदुसऱ्या सत्रात दुपारी १:०० वाजता लोकशाहीर डॉ. गणेश चंदनशीवे आणि त्यांचा संच शाहिरी सादर करणार आहेत. त्यानंतर दुपारी दीड वाजता विद्रोही जीवनगौरव पुरस्काराने अनेकांना सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये प्रा. एच.एम.देसरडा, प्रा. मा.रा.लामखेडे, तुकाराम गायकवाड, मधुकर वाकोडे, ए.के.शेख, प्रा.प्रकाश सिरसाठ, डॉ. सूर्यनारायण, रणसुभे, डॉ. सीताराम जाधव, ज्येष्ठ पत्रकार स.सो. खंडाळकर यांचा समावेश आहे.

परिसंवाददुपारी २ ते ४ या दरम्यान भारतीय विषमेच्याविरोधात विविध धर्मप्रवाहाची भूमिका आणि आजचे वास्तव या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये आदिधर्म, बौद्ध धम्म, बसवपंथ, महानुभाव, वारकरी, सत्यधर्म यावर विचार मांडण्यात येणार आहेत. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी अरविंद सुरवाडे यांची उपस्थिती राहणार आहे. तर प्रा.मोहन बाभुळगावकर, कोरणेश्वर आप्पाजी, धर्मकिर्ती महाराज, प्रभु राजगडकर, अरविंद खैरनार हे सहभागी होणार आहेत.

नाट्य अभिवाचन, रॅप, परिसंवाददुपारी चार ते साडेचार दरम्यान नवीन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. त्यानंतर वाटा पळवाटा हे दत्ता भगत लिखीत नाटकाचे डॉ. किशोर सिरसाठ हे अभिवाचन करणार आहेत. तर सागर चांदणे, राज मुंगसे, अजय देहाडे हे रॅप सादर करणार आहेत. सायंकाळी सव्वापाच ते सव्वा सात दरम्यान बोलीभाषा, प्रमाणभाषा, अभिजात भाषा आणि सांस्कृतिक वर्चस्वाचे राजकारण या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये डॉ. वंदना महाजन, डॉ. देवेंद्र इंगळे, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ.लिलाधर पाटील, डॉ. अशोक नारनवरे, डॉ. शिवाजी हुसे हे सहभागी होणार आहेत.

मराठी स्टँडअप कॉमेडी, कवी संमेलनरात्री साडेसात ते आठ दरम्यान प्रख्यात स्टँडअप कॉमेडिअन अंकूर तांगडे (बीड) सादरीकरण करणार आहे. त्यानंतर ३ रे विद्रोही मराठी साहित्य संमेलन (२०२१)चे यशस्वी आयोजन करणारे डॉ. भालचंद्र कांगो, कॉ. भीमराव बनसोड, साथी सुभाष लोमटे, शांताराम पंदेरे, भीमराव सरवदे यांचा सत्कार होणार आहे. रात्री ०:८ ते १०:३० दरम्यान कवी संमेलन होणार आहे. यामध्ये डॉ. आदिनाथ इंगोले, गंगाधार अहिरे, धोंडोपंत मानवतकर, राजेंद्र गोणारकर, प्रकाश घोडके,अरुण थोरात यांच्यासह जवळपास ५० कवि, कवयित्री कविता सादर करणार आहेत.

# अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर निर्भय कन्या अभियानाचा शुभारंभ

## महिलांनी त्यांच्या घटना दत्त अधिकारांचा वापर योग्य वेळी केला पाहिजे. अँड शकुंतला मोरे





**अहमदनगर :** अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान अंतर्गत महिलांचे घटनादत्त अधिकार या विषयावर बोलत असताना अँड शकुंतला मोरे म्हणाल्या की,घटनेत कलम १४, १५ आणि २१ नुसार महिलांना कायदेशीर संरक्षण मिळते. याशिवाय, महिलांच्या हक्कासाठी अनेक कायदे आहेत.

महिलांच्या हक्कासाठीचे कायदे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५, फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा, १९८३, कारखाना (सुधारणा) कायदा, १९८६ , महिलांचे अशोभनीय प्रतिनिधित्व (प्रतिबंध) कायदा, १९८६ ,सती आयोग (प्रतिबंध) कायदा, १९८७ मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ ,हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू विधवा पुर्नविवाह कायदा १८५६, आर्य विवाह विधिवत कायदा १९३७. अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६, किमान वेतन कायदा १९४८, वेतन प्रदान कायदा १९३६ आणि समान वेतन कायदा १९७६. या बद्दल सखोल माहिती दिली त्याच बरोबर त्या म्हणाल्या कि खरोखरच आपण्यावर अन्याय होत असेल तरच या घटनादत्त अधिकारांचा वापर करावा.

कोणाला त्रास देण्यासाठी दुसऱ्यावर अन्याय करण्यासाठी या घटनात्मक तरतुदीचा वापर करू नये असे प्रांजळ मत व्यक्त केले . याप्रसंगी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा.दिलीप कुमार भालसिंग म्हणाले की, भारतीय राज्यघटनेत महिलांसाठी जे अधिकार दिलेले आहेत त्यांचा वापर करून विविध स्तरावरील विषमता दूर करण्यास मदत होईल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी झावरे , कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा .डॉ भागवत परकाळ यांनी केले . पाहुण्याचा परिचय प्रगती शिंदे हिने दिला. तर आभार योगिता येवले हिने मानले .याप्रसंगी मराठी विभागातील प्रा .डॉ .प्रकाश सूर्यवंशी ,प्रा डॉ.सचिन मोरे हे उपस्थित होते .कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रियंका मुंगसे साक्षी निकम कापसे वैष्णवी प्रतीक्षा जिने पूजा मस्के गोपाळे मनीषा कुलात प्राची साक्षी शेळके विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ फेब्रुवारी २०२५


# ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय : एक दृष्टिक्षेप




वाङ्मयीन क्षेत्रात होणाऱ्या संशोधनातील तोच तो पणा आज सर्वांच्याच चिंतेचा विषय बनला आहे. विद्यापीठीय संशोधनाचे कार्यक्षेत्र नोकरी मिळवणे, मिळवलेली नोकरी टिकवणे, टिकवलेल्या नोकरीत प्रमोशन घेणे एवढ्या पुरतेच मर्यादित बनले आहे. शिक्षण व्यवस्थेतील संशोधनाचा दर्जा खूपच खालावलेला आहे, यावर निसंकोचपणे बोलता येते. नवीन संशोधनातून लोकाभिमुखता हाती लागेल, यावर विश्वास बसणे केवळ अशक्यप्रायबनले आहे. 1990 पूर्वी होणाऱ्या संशोधनाचा दर्जा उच्च प्रतीचा होता. जसजशी शैक्षणिक क्षेत्रातील नियमावली बदलत गेली, तसतसे सुमार दर्जाच्या संशोधनाची संख्या वाढली. याला पाच एक टक्के संशोधने अपवाद असतील. परंतु समाजोपयोगी संशोधने फारचं कमी आहेत, हे मात्र नाकारता येत नाही. आजकालची संशोधने समाजासाठी तर सोडाच परंतु संशोधकांच्याही कामाचे राहिले नाहीत, अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात होणाऱ्या संशोधनाची पातळी फारच घसरलेली आहे. हे मान्यच करावे लागते. कारण दलित आणि ग्रामीण साहित्याचे प्रयोजन हे सर्व वंचित माणसांना न्याय मिळवून देणे, त्यांचा सामाजिक स्तर उंचावणे, त्यांच्या जीवनशैलीत बदल घडवून आणणे हे होते. परंतु नवीन शैक्षणिक धोरणांमुळे सुमार दर्जाचे संशोधक निर्माण होत आहेत. एपीआय स्कोर (API SCORE) साठी लिहिणाऱ्या संशोधकांची संख्या भरमसाठ वाढली आहे. त्यासाठी लिहिणे अयोग्य आहे, असेही माझे म्हणणे नाही. परंतु मराठी भाषेत लिहिणाऱ्यांचा दर्जा सुमार बनला आहे, हेही नाकारता येणार नाही. यामुळे समाजाची जीवनशैली सकारात्मक नव्हे तर नकारात्मक दृष्ट्याच अधिक प्रभावशाली बनत चालली आहे. व्यक्तिनिष्ठ आणि जातीनिष्ठ लेखनावरच अधिकाधिक भर दिला जात आहे. हे निंदनीय आणि घृणास्पद आहे असे म्हटले पाहिजे.या पार्श्वभूमीवर प्रा.डॉ. नारायण शिवशेट्टे यांचा नुकताच प्रकाशित झालेला "ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय एक अभ्यास" हा संशोधनात्मक ग्रंथ वाचण्यात आला. हा ग्रंथ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेल्या पीएच.डी. प्रबंधाचे सुधारित रूप आहे. ग्रामीण साहित्यातील दुर्मिळ अशा लेखन प्रकारावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्यानी आत्मकथनात्मक वाङ्मयाचा कालखंड न निवडता, आत्मकथने लिहिणाऱ्या चार लेखकांचाच अभ्यास केला आहे. आत्मकथने हा वाङ्मय प्रकार ग्रामीण साहित्यामध्ये फारसा हाताळला गेला नाही. त्यामुळेच लेखकाला कालखंड निवडणे शक्य झाले नसावे असे वाटते. हे लेखकाचे पहिलेच वाङ्मयीन आपत्यही आहे. त्यामुळेच की काय प्रस्तुत ग्रंथात पहिलेपणाच्या खुणा ठळकपणे दिसतात. प्रकाशकाचेही त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. खरेतर शोध व संशोधन यातील अंतर संशोधकाला कळणे फार आवश्यक असते. ते कळले की त्याचे संशोधन अतिशय पारदर्शक होते.डॉ. नारायण शिवशेट्टे यांचा हा ग्रंथ वाचताना त्यांनी केलेले संशोधन बरेचसे पारदर्शक आहे, असे म्हणायला खुप वाव आहे. संशोधन वेगळे आणि पीएच. डी. साठी लिहिलेला प्रबंध वेगळा हे वाचकांनी समजून घेतले पाहिजे. परंतु लेखक होण्याच्या हव्यासापोटी अनेकदा, संशोधकांकडून मोठ्या चुका घडतात. आणि त्यामुळेच वाङ्मयीन व सामाजिक क्षेत्रात मोठे बिघाडही होतात. पीएच. डी चा प्रबंध हा वेळेच्या मर्यादेत पूर्ण करावा लागतो. तर निखळ संशोधनासाठी वेळ, वय आणि पृष्ठ संख्येची मर्यादा नसते. पण सत्तेपुढे कुणाचेही शहाणपण चालत नसते, हेच शेवटी खरे! मात्र डॉ. नारायण शिवशेटे यांचा "आत्मकथनात्मक वाङ्मय एक अभ्यास हा ग्रंथ वाचताना आत्मकथने व आत्मचरित्रे यातील भेद, ती का लिहिली गेली. त्याचे प्रयोजन काय? ग्रामीण साहित्यात आत्मकथने का निर्माण झाली नाहीत? या व अशा अनेक प्रकारच्या संकल्पना स्पष्ट होतात. लेखकाची धाडसाने केलेली विधानेही लक्षवेधी ठरतात. त्यामुळे हा ग्रंथ केवळ पीएच डी. चा प्रबंध वाटत नाही तर तो स्वतंत्रपणे अभ्यास करून लिहिलेला ग्रंथ वाटतो. डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी या ग्रंथाची एकूण पाच प्रकरणांमध्ये विभागणी केली आहे. पहिल्या प्रकरणांमध्ये आत्मकथन या वाङ्मय प्रकाराबद्दल सविस्तर लेखन केलेले आहे. तर वस्तुनिष्ठ चित्रण आणि आत्मनिष्ठ चित्रणातून लेखकाचा भावाविष्कार कसा होतो. हे नेमकेपणाने टिपले आहे. सत्याचा कलात्मक, कल्पनात्मक व सौंदर्यात्मक अविष्कार कसा प्रकट होतो, याची अभ्यासपूर्ण मांडणी लेखकाने केली आहे.1960 नंतर लेखन करणाऱ्या ग्रामीण साहित्यिकांपैकी चंद्रकुमार नलगे (रातवा आणि आणखी एक जन्म), डॉ. द.ता. भोसले (बाळ मुठीतील दिवस), डॉ. आनंद यादव ( झोंबी, नांगरणी, घर भिंती आणि काचवेल), प्रा. भास्कर चंदनशिव (रानसय) या चार लेखकांच्या आत्मकथनात्मक लेखनकृतीतील कौटुंबिक जीवन संघर्ष, सामाजिक जीवन संघर्ष, सांस्कृतिक जीवन संघर्ष, मोठ्या वाङ्मयीन कौशल्याने व अभ्यासपूर्ण पद्धतीने लेखक चित्रित करतात. त्याच बरोबर आत्मकथनात्मक लेखनातील वाङ्मयीन सौंदर्याचे विशेषही डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने टिपले आहेत. निवडलेल्या लेखन कृतीचे परीक्षण करतांना तटस्थपणे स्वतःची मतेही व्यक्त करावी लागतात. लेखक त्यात कुठेही कमी पडत नाही. त्यानी आपली मते अत्यंत निर्भिडपणे व तटस्थता राखून मांडली आहेत. हेच या ग्रंथाचे वेगळेपण आहे. हे मान्य केले पाहिजे. लेखकांच्या वाट्याला आलेला बाल अवस्थेतील संघर्ष, भुक दुःख आणि दारिद्र्यामुळे करपून गेलेले त्यांचे बालपण यावर लेखकाने मार्मिक भाष्य केले आहे. किशोरावस्थेत ज्ञानप्राप्तीसाठी करावा.

लागलेला शैक्षणिक संघर्ष व आर्थिक संघर्ष किती टोकाचा असू शकतो. त्यातच येणाऱ्या कौटुंबिक अडथळ्यामुळे लेखकांना काय काय यातना सहन कराव्या लागतात, याचे अत्यंत पारदर्शी मूल्यमापन लेखक डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी केले आहे. ग्रामीण साहित्यिकानी जे काही लेखन केले आहे ते शेती आणि शेतकरी यासंबंधीचे आहे. ग्रामीण जीवनशैलीचे वर्णन, शेतकऱ्यांचे दुःख, दरिद्रय, त्यांच्यावर कोसळलेले दुष्काळी संकट यावर ग्रामीण साहित्यिकांनी भरभरून लेखन केले आहे. त्यावरचे भाष्यही ग्रामीण साहित्यातून निर्भिडपणे चित्रित झाले आहे. मात्र त्याच शेतजमिनीवर काम करणाऱ्या शेतमजुरांना, गावकुसाबाहेर दुःख-दारिद्य आणि अस्पृश्यतेचे चटके सोसणाऱ्या दिन-दलित, भटके, सर्ववंचित, आदिवासी यांना साहित्यिक-विचारवंतानी ग्रामीण साहित्यात दुय्यम स्थान दिले आहे. आणि गाय, बैल, म्हैस, कुत्रा या प्राण्यांबद्दल अधिक संवेदनशीलतेने लेखन केलेले आहे. त्यांच्या लेखनातून प्रकट झालेला हा दुटप्पीपणाही तिथक्याच प्रखरतेने स्पष्ट होतो. ग्रामीण लेखकांनी असा दुटप्पीपणा का करावा हे कळायला मार्गच नाही. त्याच ग्रामव्यवस्थेतील अस्पृश्य, दिन-दलित गरीब, आदिवासी भटक्या माणसांबद्दल त्यांची संमेलनशीलता बोथट का व्हावी, घरातील स्त्रियांची घुसमटही त्यांना का दिसू नये. हे अभ्यासकासमोरचे मोठे आव्हान आहे. या त्यांच्या वृत्तीमुळे आणि प्रस्थापित व्यवस्थेच्या भितीमुळे ग्रामीण साहित्यिकांनी त्यांची वाङ्मयीन क्षेत्रातली व प्रत्यक्ष वर्तनातली व्यापकता आणि राष्ट्रीयत्व हरवले आहे. हे देखील स्पष्ट होते. या संबंधीची सकारात्मक नोंद डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी अचूकपणे घेतली आहे. 'सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. जातीभेद नष्ट झाला पाहिजे' अशी अपेक्षा लेखकाने व्यक्त केली आहे. कोणत्याही क्षेत्रातले संशोधनकार्य असो ते समाजाच्या उत्कर्षासाठी, मानवाच्या विकासासाठी आणि अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठीच झाले पाहिजे, हा संकेत आहे. परंतु समाज, राष्ट्र, आणि अवतीभवतीचा परिसर याच्याशी शैक्षणिक क्षेत्रातील विद्वानांचा दुरुनही संबंध राहिला नाही. सर्वजन लोकसत्ताक व्यस्थेचे लाभार्थी बनण्याचाच प्रयत्न करत आहेत. पुर्वसूरीच्या भुमिकेतून नव्या संशोधनाची सुटका झाली पाहिजे व ते संशोधन नवीनतेला अधिकाधिक पुढे घेऊन जाणारे ठरले पाहिजे ही मापक अपेक्षा संशोधकांकडून असते. परंतू असे अपबादानेच घडते. 'ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय या ग्रंथातून डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी ही अपेक्षा पूर्ण केल्याचे समाधान मिळते. शोध आणि संशोधन यातील अंतर संशोधकाला कळले की संशोधन जीवनमूल्यांना पुढे घेऊन जाणारे ठरते.खरे तर दलित साहित्यिकांनी ज्या धाडसाने आत्मकथने व स्व-कथने लिहिली. तो धाडसीपणा व स्वशोध घेण्याची एकनिष्ठता एकूणच ग्रामीण साहित्यात कुठेच सापडल नाही. ग्रामीण साहित्यिकांनी शेती आणि शेतकऱ्यांचे जीवन बैल, बारदाना, गाय, कुत्रा, म्हैस यांच्या पलीकडचे समाज विश्व चित्रीत केले नाही. संशोधक, अभ्यासक, विचारवंतांनाही जाती व्यवस्थेच्या चाकोरीबाहेर जाण्याचे राष्ट्रीयत्व दाखवले नाही. परंपरेची चादर अंगावर ओढून, सौंदर्यपूर्ण रीतीने इतरांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्नच ग्रामीण लेखकांनी केला. यामुळे ग्रामीण साहित्यिकांची राष्ट्रनिष्ठा, समाजनिष्ठा ठिसूळ आणि वरवरची आहे हे स्पष्ट होते. स्व-कथनांमध्ये समाजाचा व त्यांच्या समकालीन कालखंडाचा इतिहास प्रकट होत असतो. हे पहिल्या फळीतील लेखकांच्या आत्मकथनात्मक लेखनातून सिद्धही झाले.

मात्र आत्मकथनांना मिळणारी प्रसिद्धी व साहित्य अकादमीचे पुरस्कार यामुळे नंतरच्या पिढीतील लेखकांनी आत्मकथनातून, स्व-कथनातून विभत्सपणा, व्यभिचार, अनैतिक संबंध यावरच अधिक भर दिला असल्यामुळे त्यातील प्रयोजन मूल्यांवर साहित्यिकांनीच नांगर फिरवला, असे म्हणता येईल. असे असले तरीही ग्रामीण साहित्यिकांनी मनातील विचार भावना आणि कल्पना सौंदर्यपूर्ण व नाट्यपूर्ण रीतीनेच अभिव्यक्त केल्या. त्यामुळे त्यांच्या स्वनिष्ठा कुठे गुंतल्या आहेत हे लक्षात येते. केवळ एवढेच होऊन थांबत नाही तर शेती, शेतकरी आणि साहित्यिक यांच्यातील नातेही कृत्रिम असल्याचे उघड होते. लहाणपणी व युवावस्थेत गावात आणि शेतीत होरपळून निघालेला साहित्यिक, लेखक, विचारवंत शहरातील वातावरणात वितळून गेला. आणि त्यांच्या शब्दकळा आठवर्णीमध्ये खेळल राहिल्या. ग्रामीण साहित्य ही एक शेतकऱ्यांची मुक्ती चळवळ म्हणून अस्तित्वात आली होती. याचा विसर प्रस्थापित लेखकांना पडला. व नवोदितांनी तर प्रस्थापित लेखकांच्या पाठराखणीलाच वाङ्मयीन प्रयोजन, कृषिकांची मुक्तिचळवळ समजले. एयर कंडीशनर हॉलमध्ये वैचारिक रवंत करत बसणे, हेच आपले क्रांतिकार्य समजून बरेच ग्रामीण साहित्यिक शहराचा एक अविभाज्य घटक बनले. त्यामुळे ग्रामीण जीवनशैली, ग्रामीण माणूस व ग्रामीण विकास दुर्लक्षित राहिला. दलित साहित्य असो की ग्रामीण साहित्य असो अलिकडे दोघांचेही जीवनमुल्य, वाङ्मयीन मुल्य हरवलेले आहे हे वास्तव कुणालाही नाकारता येणार नाही. त्या-त्या काळात निर्माण झालेल्या साहित्याने व विचार प्रवाहाने, समग्र मनुष्याला विकसित करण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ त्रिपिटक, रामायण, महाभारत, सातीग्रंथ, संतसाहित्य यांचा समाज मनावर आजही मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, राष्टर्निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या साहित्यकृतीतून राष्टर्निर्माणाचे स्वप्न पाहिले व ते अस्तित्वातही आणले. यावरून हे स्पष्ट होते की, साहित्यातून समाजक्रांती, राजकीय क्रांती होऊ शकते. सामाजिक भान आणि मानवीमुल्य जोपासणाऱ्या साहित्यकृतींना व विचारवंत साहित्यिकांना प्रसंगी निंदा, नालस्ती व तिरस्काराला सामोरे जावे लागले असेल, परंतू समाजमनावर त्याचाच ठसा कायम राहिला हे विसरता येणार नाही. सन 1980 नंतरच्या लेखक, विचारवंत साहित्यिकांना याचा विसर पडल्याचे स्पष्टपणे लक्षात येते.आपल्या लेखनातून स्व-प्रतिबिंब, स्वाविष्कार, स्वानुभव प्रकट करणारा वाङ्मयीन प्रकार म्हणजे आत्मकथन होय. त्याचबरोबर स्व-जीवनाचा व समकालीन इतिहासाचा एकनिष्ठ आवाविष्कार म्हणजे स्व-कथने होत.

या संदर्भाने डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी आपली भुभिका प्रकट केली आहे. सुरुवातीची आत्मचरित्रे व 1970 नंतरची आत्मकथने, स्व-कथने यात फार मोठे अंतर आहे, हे स्पष्ट करतांना लेखकाना, संवेदलनशीलता आणि सर्जनशीलता जोपासता आली पाहिजे व त्याला वृद्धिंगत करता आले पाहिजे, असे म्हटले आहे. दलित स्व-कथने वयाच्या पंचवीसाव्या व तिसाव्या वर्षातही लिहिता येऊ शकतात हे दलित लेखकांनी दाखवून दिले. व पारंपरिक मराठी साहित्याची चौकट मोडली. त्यामुळे दलित स्व-कथने आणि मराठीतील आत्मचरित्रे यांच्या प्रयोजन मूल्यात खूप मोठे अंतर आहे हे स्पष्ट झाले. कालांतराने प्रसिद्धीसाठी, पुरस्कारासाठी निर्माण झालेली आत्मकथने, स्व-कथने व आत्मचरित्रे यामध्ये तोच तोपणा येत गेला आणि सर्वांचेच प्रयोजन मूल्य लुप्त झाले. ग्रामीण साहित्यिकांनी स्व-कथने, आत्मकथने लिहिण्याचे धाडस केले नाही. परंपरागत व्यवस्थेविरुद्ध विद्रोह न करणे. मनात स्त्रियांविषयीचा आकस बाळगणे, अंधश्रद्धा-दैवव्यवस्था यावर श्रद्धा ठेवणे, इतरांबद्दल द्वेष पाळणे, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना जोपासणे, जातीव्यस्थेविरुध्द उघडपणे न बोलणे यासारखी अनेक कारणे त्या पाठीमागे आहेत. त्यामुळे त्यांनी कथा, कादंबरी आणि कविता लिहिण्यावर अधिक भर दिला. दलित साहित्यिकांनी विश्वगुरु बुद्ध, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, राष्टर्निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रवाहांना आणि मूल्यांना प्रेरणास्थानी ठेवल्यामुळे त्यांच्या लेखणीत हतीचे बळ आले.

त्यामुळे त्यांनी निर्भीडपणे व्यवस्थेवर हल्ले चढवले. मानवतेचा आग्रह धरला. प्रस्थापिताविरुद्ध विद्रोह केला. वाईट चालीरीती, अंधश्रद्धा, दैववाद याविरुद्ध ते पाय रोवून उभे राहिले अंतिमतः राष्ट्र मोठे, माणूस मोठा हेच त्यांचे वाङ्मयीन मुल्य व साहित्याचे प्रयोजनमूल्य ठरल्यामुळे ते निर्भिडपणे मानवतेच्या दिशेने वाटचाल करू लागले. परंतु ग्रामीण साहित्यिकांनी राष्ट्रीय विचारमूल्यांना न स्वीकारता, गावगाड्यातील रीती-रिवाज, परंपरा जोपासल्या. वैदिक व्यवस्थेला शरण जात गांधींची प्रेरणा मुख्य स्थानी ठेवली. सन 1980 आणि सन 1990 नंतर वाढत गेलेला दलित साहित्याचा प्रभाव लक्षात घेऊन, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांना ग्रामीण साहित्यिकांनी स्वीकारल्याचा आभास निर्माण केला. परंतु भारताचे संविधान, त्यातील मुलभूत अधिकार आम्ही भारताचे लोक हे राष्ट्रीयमूल्य त्यांना फारसे जवळचे वाटले नाही. त्यांनी स्वतःला जातींच्या कोषागारात कोंडून घेतले. जातिव्यवस्थेला नाकारून, समता, स्वातंत्र्य, बंधुता, या राष्ट्रीय मूल्यांवर चालताना त्यांची फारच दमचाक झाली असावी असे वाटते.डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मयातील विविध पैलूंना स्पर्श केला आहे. कुठे स्पष्ट तर कुठे अस्पष्ट भुमिका मांडत आपली वाङ्मयीन जबाबदारी पार पाडली आहे. हे करतांना त्यांना तारेवरची कसरत करावी लागली आहे, हे जाणवल्यावाचून राहत नाही. या कसरतीत ग्रंथातील काही बार्बीकडे लेखक आणि प्रकाशक यादोघांचेही दुर्लक्ष झाल्याचे लक्षात येते. डॉ. नारायण शिवशेटे यांनी या ग्रंथातून जी अवतरणे उद्धृत केली आहेत, त्यातून पूर्वाश्रमीच्या साहित्यिक विचारवंतांनी जी मते मांडली आहेत त्यांच्याच सुरात सुर मिसळल्याचे लक्षात येते. डॉ. आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, डॉ. द.ता. भोसले प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या लेखनातील मर्यादांचा आढावा न घेता, त्यांच्या लेखनाचा केवळ गौरवच केलेला दिसतो. लेखकाने दलित आत्मकथने व ग्रामीण आत्मकथनांचा पुसटसा तौलनिक अभ्यासही केला आहे असे दिसते.

परंतु दोन्हीतील नेमका भेद व त्यातील साम्य काय याला पुरेसा न्याय दिलेला नाही, असेही लक्षात येते. हा पीएच.डी.चा प्रबंध नसून आपल्या स्वतंत्र भुभिकांना दिलेले ग्रंथरूप आहे हे जर लेखकाने लक्षात घेतले असते, तर कदाचित त्यांना बऱ्याच मर्यादा ओलांडता आल्या असत्या. व ग्रामीण साहित्याचे वर्तुळ भेदून पुढे जाता आले असते. शब्दांची सांगड घालताना आणि वाक्यरचना गुंफतांना लेखकाचा बऱ्याच ठिकाणी गोंधळ उडालेला दिसतो. पीएच.डीच्या प्रबंधातील बरेच संदर्भ जशास तसेच राहिलेले आहेत. प्रबंधातील अवतरणेही तशीच राहिली आहेत. पीएच.डी.च्या प्रबंधाला ग्रंथरूप देताना अवतरणे आणि संदर्भ आवश्यक तिथकीच लहान व पुरक असावी लागतात, हा वाङ्मयीन संकेत असतो. परंतु इथे तो पाळलेला दिसत नाही. 'ग्रामीण बहुजन समाज बहिर्मुख वृत्तीचा असल्यामुळे त्याना अंतर्मुमुख होऊन, स्वतःबद्दल लिहिणे जमले नसावे. आपले कुटुंबीय, आपली जात, आपल्या चालीरीती, अनुभव व्यक्त करताना, आपण उघडे पडू की काय, या भीतीपोटी ग्रामीण लेखकांनी आत्मकथन या वाङ्मय प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असावे याविषयी लेखकाने आपली भुभिका व्यक्त केली आहे. परंतु ग्रामीण साहित्यिकांनी विश्वगुरु बुध्द, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, राष्टर्निमोते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या परिवर्तनवादी राष्ट्रीय प्रेरणा न स्वीकारल्यामुळेच त्यांच्या आत्मकथनातून स्व-विच्छेदन करण्याचे धाडस आले नसावे असे वाटते. याविषयी लेखकाने स्पष्ट भुभिका घेतलेली दिसत नाही.

ग्रामीण जीवन, सभोवतालचा परिसर, गावकुसाबाहेरचे जीवन, शिवार, जात आणि जातिबाहेरचा समाज, निसर्ग यांचे चित्रण करताना ग्रामीण लेखकांनी जाणीवपूर्वक, नाट्यपूर्ण व कौशल्यपूर्ण रीतीने गावकुसाबाहेरचे वास्तव चित्रण टाळले असावे, याबद्दलही लेखक स्पष्टीकरण देत नाहीत. आपल्या व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचार, गुलामी, शोषण, दारिद्य, उपासमार यांना वाचा फोडताना ग्रामीण लेखकांनी स्वतःवर खूप मर्यादा घालून घेतल्याचे स्पष्टपणे जाणवते. यावरही डॉ. नारायण शिवशेट्ट यांनी निर्भीडपणे लिहायला हवे होते परंतु त्यांना ते जमले नाही. मात्र त्यांनी स्व-कथनांचे वेगळेपण स्पष्ट करताना दलितांचे दुःख, त्यांचे दैन्य, दास्य साहित्य कक्षेच्या बाहेर राहिल्याचे मत मांडून दलितांवर मानवनिर्मित गुलामगिरी लादली गेली. हे स्पष्ट करतांना, त्यांच्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराला कोणत्याच सीमा राहिल्या नाहीत. या वामन निंबाळकरांच्या मताला दुजोरा देत आपले अंतर्मन मोकळे करण्याचे धाडस धाडस दाखवले आहे. यावरून डॉ. नारायण शिवशेटे यांची भूमिका केवळ नकारात्मक नाही, हे लक्षात घ्यावे लागते. समीक्षेच्या क्षेत्रात ते नवखे असल्यामुळे व त्यांचा हा पहिलाच ग्रंथ असल्यामुळे काही बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले पाहिजे, जेणेकरून संशोधनातील त्यांचा उत्साह द्विगुणित होईल व त्यांच्या हातून मोठे वाङ्मयीन कार्य घडू शकेल. यासाठी त्यांना माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा देतो.


**प्रा.डॉ. सिध्दोधन**

मराठी विभाग प्रमुख, पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता. बिलोली जि.नांदेड-431711